# प्रेसनोट

दि. १७/०९/२०२१

## लोकसेवकास लाच दिल्याप्रकरणी प्रकरणी कारवाई

---

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| गुन्हा नोंद क्रमांक | खडक पोलीस स्टेशन, पुणे शहर गु.र.नं. ३५१/२०२१ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम – ८, १२ |
| तक्रारदार | लोकसेवक - तृप्ती कोलते, तहसीलदार, हवेली, जिल्हा पुणे. |
| आरोपी | १) दत्तात्रय हिरामण पिंगळे, वय - ३३ वर्षे, रा. देऊळगांवगाडा ता. दौंड जिल्हा पुणे.<br>२) अमित नवनाथ कांदे वय- २९ वर्षे, रा. कमलविहार, गोपाळपट्टी, मांजरी बुद्रुक ता. हवेली जिल्हा पुणे. |
| लाच दिलेली रक्कम | ५०,००१/- (पन्नास हजार एक रूपये) |
| थोडक्यात माहिती. | यातील तक्रारदार या तहसीलदार पदावर नेमणुकीस आहेत. दिनांक १३/०९/२०२१ रोजी त्यांचे शासकीय काम करीत असताना पुणे सोलापूर रोडवर शेवाळवाडी फाटा येथे वाळूने भरलेला ट्रक नंबर एम.एच/१६/टी/४१०० वर अवैध वाळू वाहतुक करताना मिळून आल्याने त्यावर कायदेशीर कारवाई करण्याची कार्यवाही सुरू केली. त्यावेळी सदर वाहन मालक - आरोपी क्रमांक १ याने तहसीलदारांना लाचेचे प्रलोभन दिले त्यास तहसीलदारांनी स्पष्टपणे नकार दिला तरीसुद्धा त्यांच्या परवानगीशिवाय वरील आरोपी क्रमांक १ याने आरोपी क्र. २ यास त्याचे मोबाईलवरून गुगल पे अकाऊंटवरून तहसीलदार यांच्या गुगल पे अकाऊंटवर रक्कम जमा करण्यास सांगीतली. त्याप्रमाणे क्र. २ याने त्याच्या गुगल पे अकाऊंटवरून तहसीलदार यांच्या गुगल पे अकाऊंटवर प्रथम १ रूपया व नंतर ५०,०००/- रूपये असे एकुण ५०,००१/- रूपये लाच रक्कम जमा करून लाच देण्याच्या गुन्हयास सहाय्य केले. रक्कम जमा झाल्याचे लक्षात येताच तहसीलदारांनी तत्काळ संबंधीत पोलीस ठाण्यात त्याबाबत लेखी कळविले तसेच ला.प्र.वि. पुणे येथे लेखी तक्रार दिली. त्यावरून वर नमुद आरोपींनी लोकसेवकास लाच देण्याचा अपराध केला म्हणून खडक पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे आज रोजी त्या दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून दोघांनाही गुन्हयाचे तपासकामी अटक करण्यात आली आहे.<br>गुन्हयाचा तपास सहायक पोलीस आयुक्त सीमा आडनाईक, ला.प्र.वि. पुणे युनिट या करत आहेत. |

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे,श्री. सुहास नाडगौडा, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४     २. ॲन्टीकरप्शन ब्युरो, पुणे -
दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी- पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. फेसबुकपेज- **www.facebook.com-maharashtraACB**
७. वेबसाईट- **www.acbmaharashtra.gov.in**

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.